प्रेस नोट दिनांक ०५/०६/२०१९

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

### हरविलेल्या अडीच वर्षीय लहान मुलीचे नातेवाईकांचा शोध घेवून तिस त्यांचे ताब्यात सुखरूप परत दिले

दि. ०३.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित लोहियानगर पोलीस चौकी येथे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक मिसाळ, व डयुटी अंमलदार पो.हवा. मिसाळ हे हजर असताना, इसम नामे अर्जुन असवरे यांनी त्यांचेसोबत अडीच वर्षीय लहान मुलीस सोबत आणून सांगितले की, सदरची लहान मुलगी ही कादरी मस्जिद समोर एकटी उभी राहुन रडत असल्याचे सांगुन ती हरविली आहे. नमुद अधिकारी यांनी तात्काळ लोहियानगर बीट मार्शलवरील कर्मचारी यांनी पोशि ७७७७ धोत्रे व पोशि ८५०० पांडे यांना बोलावुन घेवून हकीकत सांगितली. नमुद बीट मार्शलवरील कर्मचारी यांनी हरविलेल्या लहान मुलीचे मोबाईलमध्ये फोटो काढून घेवून लोहिनगर चौकी हद्दीत तिचे नातेवाईकांचा शोध घेत असताना, इनामके मळा पत्र्याचे शेड येथे एक इसम लहान मुलीचे शोध घेत असल्याचे तेथील रहिवाश्यांनी सांगितले.

नमुद बीट मार्शलवरील कर्मचारी पोशि धोत्रे व पोशि पांडे यांनी सदर ठिकाणी जावुन, इसमास भेटले असता, त्यांनी त्याचे नाव कमलेश चंद्रपाल प्रजापती रा. एकबोटे कॉलनी, सोना अर्पाटमेंट पुणे असे सांगुन त्यांची अडीच वर्षीय मुलगी हरविलेबाबत सांगितले. सदरवेळी कर्मचारी यांनी मोबाईलमधील लहान मुलीचा फोटो दाखविला असता ती त्यांचीच मुलगी असल्याचे सांगितले. ते घरसफाई करीत असताना त्यांची लहान मुलगी घराचे बाहेर खेळत होती व तेथुन हरविली असल्याचे सांगितले. सदर व्यक्तीचे नातेवाईकांना लोहियानगर पोलीस चौकीस बोलावुन घेवून हरविलेले मुलीबाबत योग्य ती खातरजमा करून हरविलेली अडीच वर्षीय मुलगी तिचे आई-वडिलांचे ताब्यात सुखरूप देण्यात आलेली आहे.

